**उत्प. 1,**
**मत्त 1,**
**एज्रा. 10,**
**प्रे. कृत्ये 1**

**1**
**जानेवारी**

# नवीन वर्षासाठीं कृपा

*तरी जो कांही मी आहे तो देवाच्या कृपेनें आहे आणि माझ्यावर त्याची जी कृपा झाली आहे ती व्यर्थ झाली नाही; परंतु ह्या सर्वांपेक्षों भी अतिशय श्रम केले, ते मी केले असे नाहीं, तर माझ्याबरोबर असणाऱ्या देवाच्या कृपेने केले. (1) करिंथकरांस 15:10)*

कृपा म्हणजे देवाचा केवळ स्वभावगुण नव्हे ज्याद्वारे तो आमची लायकी नसतांनाहि आमच्यासाठीं काहीतरी चांगले घडवून आणतो, तर ती देवा कडून असलेले वास्तविक सामर्थ्य आहे जे सतत आमच्या ठायीं आणि आमच्यासाठीं कृति करते व आमच्या ठाण आणि आमच्यासाठीं उत्तम अशा गोष्टी घडवून आणते.

पौला अतिशय श्रम करण्यासासाठी चालना मिळावी म्हणून देवाची कृपा पौलाच्या ठायीं देवाची कृति साधून देत होतीः "देवाच्या कृपेने... ह्या सवपिक्षां मी अतिशय श्रम केले." म्हणून जेव्हा पौल म्हणतों, "भीत व कांपत आपले तारण साधून घ्या," तो पुढे असेहि म्हणतो, "कारण इच्छा करणे व कृति करणे हे तुमच्या ठायीं आपल्या सत्संकल्पासाठीं साधून देणारा तो देव आहे" (फिलिप्पै 2:12-13). कृपा ही देवापासून येणारे सामर्थ्य आहे जे आमच्या ठायीं आणि आमच्यासाठीं उत्तम अशा गोष्टी घडवून आणते.

आम्हांवर हीं कृपा गतकाळात झाली आणि ती भावी काळातहि होणार आहे. ती वर्तमान समयाच्या अमर्याद झऱ्यावर सतत होणारा वर्षाव आहे, तो झरा तर भविष्यातून आमच्याकडे वाहत येणाऱ्या कृपेच्या अक्षय नदीतून वाहत आम्हांवर गतकाळात झालेल्या कृपेच्या सतत वाढत जाणाऱ्या जलाशयात भरती करतो.

पुढच्या पाच मिनिटांत, तुमच्या आत्म्याचे पोषण करणारी कृपा तुम्हांला प्राप्त होईल जी तुमच्याकडे भावीकाळातून बाहत येते, व तसेच तुम्हीं गतकाळाच्या कृपेच्या जलाशयात आणखी पाच मिनिटांची कृपा साठवून ठेवाल, गतकाळात तुम्हांवर झालेल्या कृपेला योग्य प्रतिसाद म्हणजे देवाचे आभार मानणे, आणि भविष्यात तुम्हांवर होणाऱ्या कृपेच्या अभिवचनाला योग्य प्रतिसाद म्हणजे विश्वासाठ स्थिर राहणे, गेल्या वर्षाच्या गतफाळातील आम्हांवर झालेल्या कृपेबद्दल आम्हीं देवाचे आभार मानतो, आणि ह्या नवीन वर्षासाठीं सुद्धा तो आम्हांला भविष्यातील कृपा पुरवेल असा आम्हीं विश्वास धरितो.

# आमचा नांगी नसलेला शत्रू

*ने तुम्हीं आपल्या अपराधांनी व देहस्वभावाची सुंता न झाल्यानें मेलेले होतां त्या तुम्हांस त्यानें त्याच्याबरोबर जिवंत केलें, त्यानें आपल्या सर्व अपराधांची क्षमा केर्ली; आपल्याविरुद्ध असलेले म्हणजे आपल्याला प्रतिकूल असलेलें विर्धीचे ऋणपत्र त्यानें खोडलें व वधस्तंभाला खिळून त्याने ते रद्द केलें, त्यानें सत्ताधीशांना व अधिकाऱ्यांना नाडून त्यांच्याविरुद्ध वधस्तंभावर जयोत्सव करून त्यांचे उघडउघड प्रदर्शन केलें. (कलस्सैकरांस 2:13-15)*

खिस्ताबरोबर एक होणे' ह्याचा विश्वासनाऱ्यांसाठीं खूप मोठा बदल घडून येतो याचें कारण म्हणजे हे कीं खिस्तानें कॅल्व्हरीच्या वधस्तंभावर सैतानावर निर्णायक म्हणजे अंतिम विजय मिळविला. त्यानें सैतानाला ह्या जगातून बाहेर काढून टाकलें नाहीं, तर त्यानें त्याच्या हातांतून मरणदंडाचे शत्रच हिसकावून त्याला कायमचे निःशस्त्र केलें.

आता तो विश्वासणाऱ्यांवर अशा कोणत्याहि पापाचा आरोप लावू शकत नाहीं ज्याची क्षमा नाहीं. तोच एक असा आरोप आहे जो आपला नाश करू शकतो. आणि म्हणूनच, तो आपला पूर्णपणे विनाश करण्यांस असमर्थ आहे. तो आपल्याला शारीरिक इजा करू शकतो व आपल्या भावना दुखावू शकतो इतकेंच काय, तर तो आपल्याला जिवें सुद्धा मारू शकतो. तो आपल्याला परीक्षेत पाडू शकतो आणि लोकांना आपल्याविरुद्ध चिथावू शकतो. पण तो आपला नाश करू शकत नाही.

कलस्सैकरांस 2:13-15 मधील निर्णायक विजय "आपल्या विरुद्ध असलेले म्हणजे आपल्याला प्रतिकूल असलेले विधींचे कणपत्र" बधस्तंभाला खिळिले गेले या वस्तुस्थितीमुळे झाला आहे. सैतानाने विधींच्या त्या कणपत्राला आपल्याविरुद्ध मुख्य आरोपपत्र बनविले होते. पण तो स्वर्गाच्या न्यायसर्भत सादर करू शकेल असें कोणतेही आरोपपत्र आता त्याच्याकडे नाहीं. एक गोष्ट जी त्याला आपल्या विरोधांत प्रमुखपणे करायची होती तीच करण्यांस आता तो असहाय्य आहे: आम्हांला मरणदंडास पात्र ठरविणे. आता तो तसें शकत नाही. ख्रिस्तानें आमचा मरणदंड स्वतःवर घेतला. सैतान निःशस्त्र झाला.

हे आपण आणखी एका पद्धतीने मांडू शकतो, ते म्हणजे इब्रीलोकांस पत्र 2:14-15 मध्ये असलेलें शब्द: "ख्रिस्त मानव बनला] हेतु हा कर्की, मरणावर सत्ता गाजवणारा म्हणजे सैतान, ह्याला मरणानें शून्यवत करावें, आणि जे मरणाच्या भयानें आयुष्यभर दास्याच्या बंधनात होते त्या सर्वांना मुक्त करावें."

मृत्यू आजहि आपला शत्रू आहे. पण त्याला दुर्बळ करण्यांत आलें आहे. त्या सर्पाचे विष पिळून काढून टाकण्यांत आलें आहे. त्याची प्राणघातक नांगी तोडून टाकण्यांत आली आहे. मरणाची नांगी तर पाप होते, आणि नियमशास्त्राची अट पापाचे बळ होते. परंतु ख्रिस्ताचा धन्यवाद असों ज्यानें नियमशास्त्राच्या अटी पूर्ण केल्या. "अरे मरणा, तुझा विजय कोठें? अरे मरणा, तुझी नांगी कोठे?" (1 करिंथ 15:55).

उत्प. 3,
मत्त 3,
एज्रा. 3,
प्रे. कृत्ये 3

3
जानेवारी

# येशूनें मरणाचे काय केलें

*ज्याअर्थी माणसांना एकांच मरणें व त्यानंतर न्याय होणें नेमून ठेवलें आहे, त्याअर्थी खिस्त पुष्कळांची पार्षे स्वतःवर घेण्यासाठीं एकदांच अर्पिला गेला, आणि जे त्याची वाट पाहतात त्यांना पापसंबंधात नव्हे तर तारणासाठीं तो दुसऱ्यांदा बिसेल. (इनी 9:27- 28)*

येशूच्या मरणानें आमच्या पापांचा भार वाहून नेला. हा सिद्धांत ख्रिस्ती धर्माचे मर्म आहे, आणि सुवार्तचा मुख्य विषय आहे आणि जगात देवानें मानवाच्या मुक्तीसाठीं केलेल्या महान कार्याचे मर्म आहे. ख्रिस्त मरण पावला तेव्हां त्यामीं पापें स्वतःवर वाहून नेलीं. नीं पार्षे त्याने वाहून नेलीं तीं त्याची स्वतःची पापें नव्हती. तर त्यानें इतरांनी केलेल्या पापांसाठी मरण सोसले, ह्यासाठीं कीं त्यांनी पापांपासून मुक्त व्हावें.

तुमच्या जीवनातील सर्वात मोठ्या अडचणीचे हेच समाधान आहे, मग तुम्हाला ती अडचण मोठी वाटत असों वा नसों. आपण पापी असतानांहि देवा बरोबर आपले नाते कसे पुनस्थापित होऊ शकतें या प्रन्नाचे उत्तर आहे. आणि याचे उत्तर असें की ख्रिस्ताचा मृत्यू हा "पुष्कळांची पापें स्वतःवर घेण्यासार्टी" एकदांच केलेलें अर्पण आहे. त्यानें आमची पापें उचलून तीं वधस्तंभावर नेलीं आणि जे मरण आम्हीं मरावयास पात्र होतो त्या मरणानें तो तेथे मरण पावला.

तर आता माझ्या मरणाशी ह्याचा काय संबंध आहे? "[माझ्यासाठी] एकदांच मरणें नेमून ठेवलें आहे." म्हणजे आता माझे मरण हे माझ्यासाठीं पापदंडस्वरूपाचे नाही. यापुढे माझे मरण पापसंबंधात असलेला दंड नाही. माझे पाप वाहून दूर करण्यांत आलें आहे. ख्रिस्ताच्या मृत्यूनें माझी "पापे नाहीशी" करण्यात आली आहेत, ख्रिस्तानें ती शिक्षा स्वतःवर घेतली.

मग मी अजूनहि शरीराने का मरतो? कारण देवाची अशी इच्छा आहे की पापाच्या भयंकर भयावहतेची कायमस्वरूपी साक्ष म्हणून मरण सांप्रतकाळी जगामध्येच कायम असावें, आणि ते त्याच्या स्वतःच्या लेकरांमध्येहि कायम असावें. जेव्हां आम्हीं मरतो तेव्हां त्या मरणाद्वारे आपण ह्या जगात पापाचे आजहि कायम असलेले बाह्य परिणाम प्रकट करतो.

पण देवाच्या मुलांसाठी हे ऐहिक मरण आता त्यांच्यावर असलेला त्याचा कोप नाही. तें मरण आता आम्हांसाठीं दंडाज्ञा नाही, तर आमच्या तारणाचे प्रवेशद्वार बनले आहे.

**4**
**जानेवारी**

**उत्प. 4,**
**मत्त 4,**
**एज्रा. 4,**
**प्रे. कृत्ये 4**

## अल्प विश्वास

*ह्यावरून है इच्छा बाळगणाऱ्यावर नव्हे किंवा धावपळ करणाऱ्यावर नव्हे, तर दया करणाऱ्या देवावर अवलंबून आहे. (रोमकरांस 9:16)*

वर्षाच्या अगदी सुरुवातीलाच आपण हे स्पष्ट समजून घेऊया की येशूवर विश्वास ठेवणारे म्हणून या वर्षी देवाकडून आपल्याला जे काहीं मिळेल, तर्ती केवळ त्याची दया आहे. जे काही सुख किंवा जे काही दुःख आपल्या वाट्याला येतील तें सर्व दया करणाऱ्या देवापासून असतील.

खिस्त ह्याकरितां जगात आलाः "असे की.... परराष्ट्रीयांनी त्याच्या वयेमुळे देवाचें गौरव करावें" (रोमकरांस 15:9). शिवाय, "त्यानें आपल्या महादयेनुसार आपल्याला पुन्हा जन्म दिला" (1 पेत्र 1:3), "आपल्यावर दया व्हावी" (इब्री 4:16) अशी आम्हीं रोज प्रार्थना करतो; आणि आता आपण "सार्वकालिक जीवनासाठीं आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या दयेची वाट पाहत आहों (यहूदा 1:21). जर कोणी खिस्ती मनुष्य विश्वासू असल्याचे सिद्ध करतो, तर तो ते "विश्वासू होण्याची दया प्रभूद्वारे झाली आहे" म्हणून करतो (1 करिथकर 7:25). लूक 17:5-6 मध्ये, प्रेषित प्रभूला विनंती करतात, "आमचा विश्वास वाढवा!" तेव्हां येशू म्हणतो, "तुम्हांमध्ये मोहरीच्या दाण्याएवढा विश्वास असेल, तर ह्या तुतीला, 'तू मुळासकट उपटून समुद्रांत लाविली ना,' असें तुम्हीं सांगताच ती तुमचें ऐकेल." म्हणजे, आपल्या ख्रिस्ती जीवनांत आणि सेर्वेत घडणाऱ्या गोष्टी ह्या आपल्या विश्वासाच्या बळकटीमुळे किंवा परिमाणामुळे होत नाहींत, कारण झाडे मुळांसकट उपटून टाकणे हे त्यामुळे होत नाहीं. ते देव करतो. म्हणून, सर्वात कमी विश्वास जो खऱ्या अभनि आम्हांला खिस्ताशी जोडतो तो विश्वास त्याच्या सामर्थ्याद्वारे आपल्यासाठीं गरजेच्या असलेल्या सर्व गोष्टीं घडवून आणावयांस पुरेसा आहे.

पण ज्यां ज्यां प्रसंगी तुम्हीं यशस्वीपणे प्रभूची आज्ञा पाळता त्या त्या प्रसंगांचे काय? तुमचा आज्ञाधारकपणा तुम्हाला दयेसाठीं विनवणी करणाऱ्यांच्या श्रेणीतून बाहेर काढते का? लूक 17:7-10 च्या पुढील वचनांमध्ये येशू असें उत्तर देतो :

"तुम्हांपैकी असा कोण आहे की, त्याचा नांगरणारा किंवा मेंढरें राखणारा दास शेतातून आल्यावर तो त्याला म्हणेल, 'आतांच येऊन जेवाववाला बैस,' उलट माझे जेवण तयार कर, माझें खाणेंपिणें होईपर्यंत कंबर बांधून माझी सेवा कर, आणि मग तूं खा व पी,' असे तो त्याला म्हणणार नाहीं काय? सांगितलेली कामें दासाने केलीं म्हणून तो त्याचे उपकार मानतो काय? त्याप्रमाणें तुम्हांला सांगितलेली सर्व कामें केल्यावर आम्हीं निरुपयोगी दास आहों, आम्हीं आमचे कर्तव्य केलें आहे, असे म्हणा."

यांवरून मीं असे मानतो कीं, पूर्ण आज्ञाधारकपणा आणि सर्वात कमी विश्वास यां दोन्हीं गोष्टीं देवाकडून एकच गोष्ट प्राप्त करून घेतांत : ती म्हणजे कृपा. फक्त मोहरीच्या दाण्याएवढा विश्वास जरी असेल, तर तो झाड हलविणारी कृपा प्राप्त करून देण्याइतपत हितकारक ठरतो. आणि निष्कपट आज्ञाधारकपणा आपल्याला पूर्णपणे दयेवर विसंबून ठेवतो.

शेवटी मुख्य मुद्दा हा आहे : देवाच्या दयेचे निमित्त किंवा स्वरूप काहीही असो, दयेचे अपात्र लाभार्थी म्हणून आपली जी लायकी आहे, त्यापलीकडे आपण कधींच जात नाहीं. जी गोष्ट प्राप्त होण्यांस आपली पात्रता नाही त्यां गोष्टींसाठीं आपण नेहमी पूर्णपणे विसंबून राहतो.

ह्यास्तव या, आपण स्वतःला नम्र करूं, आणि आनंद करूं आणि "त्याच्या दयेमुळे देवाचें गौरव करूं!"

# अपूर्ण ख्रिस्ती लोकांसाठीं आशा

*कारण पवित्र होणाऱ्यांना त्यानें एकाच अर्पणानें सर्वकाळचे पूर्ण केलें आहें. (इब्री 10:14)*

हा शास्त्रलेख आपल्यांसारख्या अपूर्ण पाप्यांसाठीं उत्तेजनानें भरलेला आहे, आणि त्यांत पवित्र जीवनासाठीं विपुल प्रेरणा आहे.

म्हणजेच तुम्हीं तुमच्या स्वर्गीय पित्याच्या दृष्टीनें पूर्ण आणि सिद्ध आहांत अशी खात्री तुम्हीं बाळगू शकता, पण तुम्हीं स्वतःमध्ये पूर्ण आहांत असे नाही, तर नेमके ह्यामुळे कर्की तुम्हीं आता पूर्ण नसता "पवित्र केले जात आहांत", "पवित्र बनविले जात आहांत" - म्हणजे असे की, देवाच्या अभिवचनांवर विश्वासाद्वारे, तुम्हीं तुमच्या हेलकावणाऱ्या अपूर्णतपासून अशा अंशानें वाढत जाणाऱ्या पवित्रतेकडे वाटचाल करित आहांत. हाच इब्री 10:14 चा प्रमुख मुद्दा आहे.

तुमचा विश्वास तुमच्यांत पापाचा त्याग करण्याची आणि पवित्रतेत अंशा-अंशानें प्रगती करण्याची उत्कंठा निर्माण करतो का? हा असा विश्वास आहे कीं जो अपूर्णतिच्या ढगाळ स्थितिंतहि खिस्ताकडे पाहून म्हणू शकतो, "तूं तर मला तुझ्या दृष्टीनें पूर्वीच पूर्ण केलें आहेस."

हा विश्वास म्हणतो, "खिस्ता, आज मीं पाप केले आहे. पण मला माझ्या पापाचा बीट आला आहे. कारण तूं नियमशाखातील आचार माझ्या अंतःकरणात लिहिलें आहेस, म्हणून ते पाळण्याची मला उत्कंठा लागली आहे. आणि जे काहीं तुझ्या दृष्टीनें मान्य व आवडणारे आहे तें तूं माइयामध्ये साधून देत आहेस (इब्री 13:21). आणि म्हणून, जीं पार्षे अद्यापहि माझ्या हांतून होतांत त्यां पापांचा मला बीट आला आहे, इतकेच नव्हे, तर मला माझ्या मनांत उद्भवणाऱ्या पापी विचारांचा सुद्धा बीट आला आहे."

हाच तो खया आणि अस्सल विश्वास आहे ज्याद्वारे आम्हीं तारले जातो. हाच तो विश्वास आहे जो पुढील बचनांचा गोड आस्वाद पेऊ शकतो: 'कारण पकित्र होणाऱ्यांना त्याने एकाच अर्पणाने सर्वकाळचे पूर्ण केले आहे." हा बलवानांचा गर्विष्ठपणा नाहीं. ही त्यां दुर्बळ पाप्यांची ओरड आहे ज्यांना तारणकर्त्याची गरज आहे.

मी तुम्हांला हाक मारतो, तुम्हांला विनंती करतो कीं, इतके दुर्बळ व्हां की खिस्तावर तुमचा असा विश्वास शोभून दिसला पाहिजे,